पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११०१८
लेखा व वित्त विभाग
मुंबई पुणे रोड, पिंपरी, पुणे ४११ ०१८,
Website – pcmcindia.gov.in
E-mail – account@pcmcindia.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जावक क्र.लेखा/२९/कावि/२६१/२०२२

दिनांक :- ७ / ९ /२०२२

## परिपत्रक

विषय:- म.न.पा कार्यालयीन वाहने व जनरेटर इंधनाकरीता प्रिपेड पेट्रो कार्ड च्या आगाऊ रक्कमेबाबत.

संदर्भ:- १) परिपत्रक क्र.लेखा/२९/कावि/९५/२०२२ दि.०३/०६/२०२२
२) परिपत्रक क्र.लेखा/२९/कावि/१९९/२०२२ दि.०४/०८/२०२२
३) आदेश क्र.लेखा/२९/कावि/२२१/२०२२ दि.१८/०८/२०२२

मा.आयुक्त सो यांचेकडील संदर्भिय परिपत्राकानुसार मनपाच्या विविध विभागांची वाहने व जनरेटर इंधनाकरीता बॅंक ऑफ बडौदा यांचेकडून प्रिपेड पेट्रो कार्ड ची सुविधा देणेत आलेली असून त्या प्रिपेड कार्ड वर र.रू.१०,०००/- आगाऊ रक्कम देणेत आलेली आहे. सदरची आगाऊ दिलेली र.रू१०,०००/- ही रक्कम ब-याच विभागांना अपुरी पडत असल्याने अनेक विभागप्रमुखांनी लेखा विभागास कळविलेले आहे. मा.आयुक्त सो यांचेकडील संदर्भ क्र.३ चे आदेशान्वये सदरची आगाऊ रक्कम १०,०००/- ऐवजी र.रू.३०,०००/- करणेत आलेली आहे. त्यानुसार सर्व विभागांना सुचीत करणेत येते की, कार्यालयीन वाहने व जनरेटर इंधनाकरीता र.रू.३०,०००/- आगाऊ रक्कम मंजुर करणेत आलेली आहे. विभागांना यापूर्वी र.रू.१०,०००/- आगाऊ रक्कम देणेत आलेली आहे. ज्या विभागांना आवश्यकता आहे त्यांनी उर्वरीत र.रू.२०,०००/- आगाऊ रक्कमेची देयके लेखा विभागाकडे सादर करावीत. विभागांनी देयके संगणक प्रणालीमध्ये तयार करताना ई-सीएस व्दारे करावयाचे असून पैसे घेणा-याचे नाव ( Party name ) या ठिकाणी प्रिपेड कार्ड क्रमांक टाकावा व बॅंक खाते क्रमांक (Bank A/c No.) या ठिकाणी 31060200000336 टाकावा, बॅंक IFSC Code – BARB0DRCCHI व इतर संबंधीत तपशिल भरणेत यावा. विभागांना संपूर्ण र.रू.३०,०००/- अदायगी झालेनंतर विभागांनी सदरची रक्कम खर्च करताना र.रू.२०,०००/- पर्यंत खर्च करून कार्ड वर र.रू.१०,०००/- शिल्लक ठेऊन खर्च झालेल्या रक्कमेची देयके प्रतिपूर्ती कामी लेखा विभागाकडे सादर करावयाची आहेत. सदर परिपत्रकाची नोंद सर्व संबंधीत विभागांनी घेणेत यावी व सर्व संबंधीत कर्मचारी यांचे निदर्शनास आणून देणेत यावे.

( जितेंद्र कोळंबे )
मुख्य लेखा व वित्त अधिकारी
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी

प्रत:-

सर्व विभाग